PREMIUM QUALITY FOOD IN DHULE
* Dosas * Sandwiches * Pav Bhaji * Pulao * Frankie
* Pizza * Fries * Chopsuey / Noodles * Momos
* Soup * Punjabi / Chinese / Continental * Starters
* Sizzler * Tandoor Starters * Chaap * Thali
Main Course * Juices * Falooda / Milkshakes / Dessert
JAIN FOOD AVAILABLE FREE HOME DELIVERY
SPACE FOR KITTY / BIRTHDAY PARTY
B'Live Restaurant
Below Card House, Lane No.5,
Near Sonya Maruti, Dhule
9423928900 / 9307868768
Also available on zomato SWIGGY

आपला महाराष्ट्र

मूल्य २.००

संस्थापक - लोकमित्र भाई मदाने

WWW.APLAMAHARASHTRA.IN

संयुक्त वर्ष ७० ■ अंक क्र.१६ ■ शनिवार १७ ऑक्टोबर २०२६ ■ धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक आवृत्ती ■ पाने ४

POST REGD.NO./DHL/53/24-26

उत्कृष्ट क्वालिटी
सागर ड्रायफ्रुट
पत्ता : व्ही.के.चौधरी मार्केट, हॉटेल शेरे पंजाब समोर, पाचकंदिल, धुळे (मो.९३७११९२०००)

संविधान असे पर्यंत निर्णय संसदेतच होतील संविधानाचे सामर्थ्य लक्षात घ्या : मुख्यमंत्री

मुंबई, दि. १६ : जोपर्यंत भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेले संविधान देशात आहे, तोपर्यंत देशातील निर्णय संसदेतच होतील. हा भारत आहे, पाकिस्तान, नेपाळ, बांगलादेश किंवा श्रीलंका नाही. संविधानाचे सामर्थ्य लक्षात घ्या, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. संविधानाची ताकद, लोकशाहीची मूल्ये आणि देशातील न्यायव्यवस्थेचे महत्त्व अधोरेखित करत त्यांनी आपली भूमिका मांडली. मुंबईत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत नागरिकशास्त्र आणि संवैधानिक मूल्यांवर आधारित स्मार्ट नागरिक तसेच भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर आधारित विद्यार्थी प्रेरणा या पुस्तिकांचे प्रकाशन करण्यात आले.



बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शाळांमधील विद्यार्थ्यांमध्ये संविधानाविषयी जागरूकता निर्माण करणे आणि त्यांच्यात संवैधानिक मूल्यांची रुजवण करणे, हा या उपक्रमाचा उद्देश आहे. यावेळी बोलताना फडणवीस यांनी संविधानाचे महत्त्व स्पष्ट केले. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, गेल्या काही वर्षांत संविधान आणि लोकशाहीवर हल्ला करण्याचे अनेकदा प्रयत्न झाले. मात्र, भारतीय संविधान इतके मजबूत आहे की देशाच्या लोकशाहीला कोणीही धक्का लावू शकले नाही. देशातील सत्ताबदल हा निवडणुकांच्या माध्यमातून आणि संविधानाने निश्चित केलेल्या प्रक्रियेनुसारच होतो, असेही त्यांनी स्पष्ट केले.

भारतामध्ये पाकिस्तान, बांगलादेश, नेपाळ किंवा श्रीलंकेसारखी परिस्थिती निर्माण करण्याचा विचार करणाऱ्यांनी संविधानाचे सामर्थ्य लक्षात घ्यावे, असे फडणवीस म्हणाले. भारतीय संविधानाने प्रत्येक नागरिकाला न्याय मिळवण्याचा अधिकार दिला आहे. त्यामुळे नागरिकांनी न्याय मिळवण्यासाठी संवैधानिक मार्गाचा अवलंब करावा. असंवैधानिक मार्गाने जाणाऱ्यांबाबत कायदेशीर तरतुदी काय आहेत, हेही संविधानाने स्पष्ट केले असल्याचे त्यांनी सांगितले. संविधानामुळे समान संधी आणि न्याय

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी जगातील विविध देशांच्या संविधानांचा अभ्यास करून आणि भारतातील सामाजिक परिस्थिती व मूल्यांचा **(पान ४ वर)**

हेक्टरी एक लाख पाहिजे अन्यथा मंत्र्यांना गाव बंदी

नागपूर, दि. १६ : राज्यातील दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना दिवाळीपूर्वी प्रति हेक्टरी एक लाख रुपयांची थेट आर्थिक मदत द्यावी, अन्यथा संतप्त शेतकरी रस्त्यावर उतरून मंत्र्यांच्या गाड्या अडवतील, असा इशारा काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी दिला. नागपूर येथे पत्रकार परिषदेत त्यांनी सरकारने जाहीर केलेल्या पाच हजार रुपयांच्या अग्रिम मदतीवर तीव्र टीका केली. तसेच बीड जिल्ह्यातील कथित ८० कोटी रुपयांच्या पशुधन योजनेतील गैरव्यवहार, केंद्राकडून महाराष्ट्राला मिळणारी मदत आणि राज्यातील राजकीय व सामाजिक प्रश्नांवरही भाष्य केले.

दिवाळी कशी गोड होणार?

राज्य सरकारने जाहीर केलेली पाच हजार रुपयांची अग्रिम मदत शेतकऱ्यांच्या अडचणींच्या तुलनेत अत्यंत अपुरी **(पान४ वर)**

परिस्थितीजन्य पुराव्यांचा आधार

डोंगराळे येथील चिमुरडी हत्या प्रकरणात विजय खैरनारला याला फाशीची शिक्षा

मालेगाव, दि. १६ : नाशिक जिल्ह्यातील मालेगाव तालुक्यात असलेल्या डोंगराळे येथे साडेचार वर्षीय बालिकेवर लैंगिक अत्याचार करून तिची निर्घृण हत्या करणाऱ्या विजय खैरनार याला न्यायालयाने फाशीची शिक्षा सुनावली आहे. डोंगराळे येथे सोळा नोव्हेंबर २०२५ रोजी घडलेल्या या घटनेने संपूर्ण महाराष्ट्रात संतापाची लाट उसळली होती. तब्बल दहा महिन्यांनंतर १६ ऑक्टोबर २०२६ रोजी मालेगाव येथील अपर जिल्हा व सत्र न्यायालयाने हा महत्त्वपूर्ण निकाल दिला. न्यायालयाने हा गुन्हा दुर्मिळातील दुर्मिळ असल्याचे निरीक्षण नोंदवले



असून, पीडितेच्या कुटुंबीयांना १० लाख रुपयांची आर्थिक मदत मंजूर केली आहे.

निकालानंतर विशेष सरकारी वकील उज्ज्वल निकम यांनी या खटल्यातील युक्तिवाद आणि पुराव्यांबाबत माहिती दिली. ते म्हणाले, ती मुलगी त्या मुलाला दादा म्हणायची. ती दादाचे बोट धरून त्याच्यासोबत गेली होती. आरोपीने दादा या नात्याचाच खून केला आहे. आरोपीच्या चेहऱ्यावर सुनावणी दरम्यान पश्चात्तापाची कोणतीही भावना दिसून आली नसल्याचेही निकम यांनी सांगितले. या खटल्याचे वैशिष्ट्य म्हणजे आरोपीने गुन्हा करताना प्रत्यक्ष पाहिलेला साक्षीदार नव्हता. पीडित मुलगी आरोपीसोबत गेली होती, मात्र आरोपीने तिला नंतर सोडून दिल्याचा दावा केला होता. घटनास्थळी सीसीटीव्ही फुटेजही उपलब्ध नव्हते. त्यामुळे तपास आणि खटल्यात परिस्थितीजन्य पुराव्यांची साखळी उभी करणे महत्त्वाचे ठरले. विशेष सरकारी वकील उज्ज्वल निकम यांनी न्यायालयात या पुराव्यांच्या आधारे आरोपीविरोधात युक्तिवाद केला. पोलिस, वैद्यकीय अधिकारी, ग्रामस्थ आणि **(पान ४ वर)**

जिल्हा व सत्र न्यायालयाच्या मुख्य प्रवेश व्दाराजवळ कर्मचाऱ्यांचे समान काम समान वेतनसाठी आंदोलन

धुळे, दि.१६- मा. उच्च न्यायालयातील कर्मचाऱ्यांना लागू असलेल्या वेतन श्रेणीप्रमाणे दुय्यम न्यायालयातील कर्मचाऱ्यांनाही वेतन मिळावे, या प्रमुख मागणीसाठी जिल्हयातील व तालुका न्यायालयातील कर्मचाऱ्यांनी १६ ऑक्टोंबर रोजी काळ्या फिती लावून कामकाज करीत सरकारचा निषेध नोंदविला.



मुंबई उच्च न्यायालय व खंडपीठातील कर्मचाऱ्यांप्रमाणे दुय्यम न्यायालयांतील कर्मचाऱ्यांनाही सुधारित वेतन श्रेणी लागू करावी, ही कर्मचाऱ्यांची प्रमुख मागणी आहे. शासनाकडून शासन निर्णय काढण्यास होत असलेल्या विलंबाच्या निषेधार्थ राज्यातील सर्व न्यायालयीन कर्मचारी यांनी टप्याटप्याने आंदोलन करण्याचे नियोजन केले असून शासनाने सुधारित वेतनश्रेणीसह प्रलंबित मागण्यांवर तातडीने निर्णय घ्यावा अशी मागणी महाराष्ट्र राज्य न्यायालयीन कर्मचारी **(पान ४ वर)**

चौकशी आयोगाची स्थापना एमपीएससी अध्यक्षपद तूर्त सतीश वाघोले यांच्याकडे

मुंबई, दि.१६ : महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे (एमपीएससी) अध्यक्ष विवेक भीमनवार रजेवर गेल्याने अध्यक्षपदाचा अतिरिक्त कार्यभार आयोगाचे सदस्य सतीश बबन वाघोले यांच्याकडे सोपविण्यात आला आहे. राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांच्या वतीने यासंदर्भातील आदेश जारी करण्यात आले आहेत. एमपीएससीच्या परीक्षांमधील पेपरफुटी आणि कथित गैरप्रकारांच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय घेण्यात आला आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत अन्न व **(पान ४ वर)**

मुख्य निवडणुक आयुक्तांना पदावरून तात्काळ हटवा विविध संघटनांच्या पदाधिकाऱ्यांचे राष्ट्रपतींना निवेदन

धुळे, दि.१६- मुख्य निवडणुक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या कार्यपध्दतीची चौकशी करून तात्काळ पदावरून हटविण्यात यावे. त्यांनी घेतलेल्या निर्णयांची निवृत्त सुप्रीम कोर्टाचे न्यायाधीशांच्या माध्यमातून चौकशी करून देशद्रोहाचा गुन्हा दाखल करावा. यांसारख्या अनेक मागण्यांचे निवेदन स्वाभिमानी क्रांती सेना, संविधान संरक्षण समिती व पुरोगामी विचार मंचच्या पदाधिकाऱ्यांनी राष्ट्रपतींना जिल्हाधिकाऱ्यांच्या माध्यमातून निवेदन दिले.



निवेदनात देशातील निवडणूक बॅलेट पेपरवरच घेण्यात यावी. इव्हीएम मशीन जगाने नाकारले आहे. भाजपा सेटींग करूनच निवडणुक जिंकते असा जनतेला संशय आहे. जातीनिहाय जनगणना करून लोकसंख्या निश्चिती नंतरच सुधारीत मतदार याद्या तयार करणे. म्हणजेच स्थलांतरीत नागरिकांची नावे जिथे वास्तव्य आहे तिथे कायम करणे व मृत व्यक्तींचे **(पान ४ वर)**

कापूस विकून आलेले तीन लाख लांबवले

धुळे, दि.१६- शिरढाणे (प्र. डांगरी, ता. धुळे) येथील शेतकऱ्याच्या घरातून चोरट्याने तीन लाख चार हजारांची रोकड चोरून नेली. आपल्या शेतातील कापूस विक्रीतून मिळालेली रोकड त्यांनी घरातील दुसऱ्या मजल्यावरील कपाटात ठेवली होती. दुष्काळात तेरावा महिना.... अशी स्थिती शेतकऱ्याची झाली असून जे काही थोडे फार पैसे आले तेही चोरट्यांनी लंपास केले.

शेतकरी प्रल्हाद भिका पाटील यांनी १५ ऑक्टोबरला आपल्या शेतातील कापूस व्यापाऱ्याला विकला होता. या विक्रीतून मिळालेली ३ लाख ४ हजार रुपये घरातील **(पान ४ वर)**

डुकरांकडून मका उध्दवस्त पोलिसात तक्रार दाखल

शिंदखेडा, दि.१६- दराणे (ता. शिंदखेडा) येथील शेतकरी प्रविण नरेंद्र पवार यांच्या शेतातील पिकांचे मोकाट पाळीव डुकरांनी मोठे नुकसान केले आहे. याप्रकरणी शिंदखेडा पोलीस ठाण्यात तक्रार अर्ज दाखल करण्यात आला आहे.

तक्रारीनुसार, दराणे शिवारातील गट क्रमांक ३९७ ब मधील मक्याच्या पिकाचे २५ ते ३० मोकाट डुकरांनी प्रचंड नुकसान केले. तसेच शेजारील शेतकरी भालेराव बापू पवार यांच्या भुईमुगाच्या पिकाचेही नुकसान झाले आहे. यामुळे अंदाजे ३० ते ३५ हजार रुपयांचे नुकसान झाले असल्याचे नमूद करण्यात आले आहे. **(पान २ वर)**

शेतकरी अल्प मदतीच्या निषेधार्थ शिवसेनेचे आंदोलन मुख्यमंत्र्यांच्या नावे जिल्हाधिकाऱ्यांकडे ५ हजार १ सुपूर्द

नंदुरबार, दि.१६- महाराष्ट्रासह नंदुरबार जिल्ह्यात दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झालेली असताना राज्य सरकारने शेतकऱ्यांसाठी जाहीर केलेली मदत अपुरी असल्याचा आरोप करत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने अनोखे आंदोलन करण्यात आले. शेतकऱ्यांना जाहीर केलेली मदत तुटपुंजी असल्याचा निषेध म्हणून शिवसेनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते व शेतकऱ्यांच्या वतीने प्रत्येकी ५० रुपये जमा करून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व त्यांच्या परिवाराला दिवाळी साजरी करण्यासाठी नंदुरबार शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने भेट स्वरूपात ५ हजार १ रुपयांची रक्कम देण्यात येणार आहे.



नंदुरबार जिल्ह्यात दुष्काळामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडले असून, पिण्याच्या पाण्याची टंचाई, जनावरांसाठी चाऱ्याचा प्रश्न आणि शेतीचे नुकसान अशा अनेक समस्यांना **(पान २ वर)**

पोहताना दुखापत तरुणाचा मृत्यू

धुळे, दि.१६- शेत तलावात पोहण्यासाठी उडी मारल्याने डोके व मानेला मार लागल्याने मुंबई येथे उपचार सुरू असताना तरुणाचा मृत्यू झाला. जितु प्रताप पवार (वय १८ वर्षे रा. झंझाळे, पो. जेबापुर ता. साक्री) असे त्याचे नाव आहे.

जितु पवार हा एकटाच गावातील पानथडीच्या बाजुला असलेला एका शेत तलावात पोहण्यासाठी गेला होता. त्याने त्या शेत तलवात उडी मारली असता, त्या शेत तलावातील दगडावर त्याचे डोके आपटले. त्यामुळे डोके व मानेला दुखापत झाली होती. त्यावरुन नातेवाईकांनी त्याला पिंपळनेर येथील खासगी रुग्णालयात **(पान २ वर)**

परिचर्या संवर्गातील पदे सरळ सेवेने भरण्यासाठी कर्मचारी संघातर्फे बेमुदत आंदोलनास सुरूवात

धुळे, दि. १६ (प्रतिनिधी) : राज्यातील वैद्यकीय शिक्षण-संशोधन विभागांतर्गत वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयांमध्ये रिक्त असलेली पाच हजाराहून अधिक परिचर्या संवर्गातील पदे सरळ सेवेने भरण्यात यावीत, या प्रमुख मागणीसाठी राष्ट्रीय मूलनिवासी बहुजन कर्मचारी संघातर्फे धुळ्यात शुक्रवार पासून बेमुदत आंदोलन सुरू करण्यात आले आहे. धुळ्यातील हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या अधिष्ठाता कार्यालयासमोर हे आंदोलन करण्यात येत आहे.



प्रमुख मागणीसह निरनिराळ्या मागण्यांचे निवेदन अधिष्ठाता कार्यालयास दिल्याचे आंदोलनकर्त्यांनी सांगितले.

राज्यात नव्याने सुरू झालेल्या तसेच जुन्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये कर्मचाऱ्यांच्या निवृत्ती आणि पदोन्नतीमुळे परिचर्या संवर्गातील पाच हजाराहून अधिक पदे रिक्त असल्याचे संघटनेने निवेदनात म्हटले आहे. या रिक्त पदांवर नवीन **(पान २ वर)**

दुष्काळाचे निवारण कर गं अंबे!

अल्पा अग्रवाल यांच्या नेतृत्वात आज महिलांची खंडेराव मंदिरापासून रॅली

धुळे, दि.१६- धुळे जिल्ह्यासह राज्यावर ओढवलेले दुष्काळाचे संकट दूर व्हावे, जगाचा पोशिंदा असलेल्या बळीराजाला यातून दिलासा देत सुख-समृद्धी लाभावी, संपूर्ण राज्यात भरपूर पर्जन्यवृष्टी व्हावी म्हणून नवरात्रोत्सवाच्या पार्श्वभूमीवर दि.१७ सकाळी खान्देश कुलस्वामिनी आदिशक्ती श्री एकवीरामातेला साकडे घालण्यात येणार आहे. त्यासाठी भारतीय जनता पक्षाच्या बेटी बचाव बेटी पढाव अभियानाच्या प्रदेश प्रभारी अल्पा अनुप अग्रवाल यांच्या नेतृत्वात आग्रा रोडवरील खंडेराव महाराज मंदिरापासून श्री एकवीरा माता मंदिरापर्यंत फूट चुनरी रॅली काढण्यात येणार आहे.



धुळे जिल्ह्यासह राज्यात यंदा पावसाअभावी दुष्काळाचे संकट उभे राहिले आहे. यामुळे राज्यातील शेतकरी मोठ्या संकटात सापडले आहेत. राज्यातून या दुष्काळी संकटाचे निवारण व्हावे, या परिस्थितीतून सावरत शेतकऱ्यांना सुख-समृद्धी लाभावी, संपूर्ण राज्यात भरपूर पाऊस होऊन रानशिवार हिरवळीने खुलून जावे यासाठी भारतीय जनता पक्षाचे बेटी बचाव-बेटी पढाव अभियान तसेच भारतीय जनता पक्षाच्या महिला आघाडीतर्फे अल्पा अग्रवाल, महापौर मायादेवी परदेशी यांच्यासह महिला आघाडी पदाधिकाऱ्यांच्या नेतृत्वात शनिवारी (ता.१७) सकाळी खान्देश कुलस्वामिनी आदिशक्ती श्री एकवीरामातेला साकडे घालण्यात येईल. नवरात्रोत्सवाच्या पावन पर्वावर शहरातील आग्रा रोडवरील श्री खंडेराव महाराज मंदिरापासून सकाळी आठला श्री एकवीरामाता मंदिरापर्यंत ४०१ फुटांची चुनरी पदयात्रा काढण्यात येईल. तेथे पोहोचल्यानंतर श्री एकवीरामातेला ही चुनरी अर्पण करण्यात येईल.

या पदयात्रेत भारतीय जनता पक्षाच्या महिला आघाडीच्या महानगर पदाधिकाऱ्यांसह विविध आघाड्यांचे पदाधिकारी, बेटी बचाव-बेटी पढावच्या महिला पदाधिकाऱ्यांसह महिला नगरसेविका, शालेय-महाविद्यालयीन विद्यार्थिनी सहभागी होतील. या चुनरी पदयात्रेत शहरातील महिला भगिनींसह पुरुष भाविकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन बेटी बचाव-बेटी पढाव अभियानासह भाजपच्या महिला आघाडीने केले.

बुलेटस्वारांना चाप, सायलेन्सवर फिरला रोलर

शिरपूर दि.१६ (का.प्र.): शहरातून भरधाव जात सायलेन्सरमधून फटाक्यांसह विविध कर्कश्य आवाज काढणाऱ्या बुलेटस्वारांवर शहर पोलिसांनी अखेर कारवाईचा बडगा उगारला. शहरातील करवंद नाका परिसरात अशा बुलेटस्वारांना अडवून त्यांच्या वाहनाचे सायलेन्सर काढून घेण्यात आले. त्यानंतर रोड रोलरखाली चिरडून सायलेन्सर निकामी करण्यात आले.

नागरिकांसह सर्वच घटकांना फटाका बुलेटचा खूप मोठा त्रास होता. छपरी चाळे करणाऱ्या मवाल्यांकडून गर्दीत मुद्दामच जोराने बुलेट चालवून फटाक्यांचे आवाज **(पान २ वर)**

अनधिकृत फलकांवर दंडात्मक कारवाईचा महापालिकेचा इशारा

धुळे, दि.१६- धुळे महानगरपालिका हद्दीतील सर्व स्थिर जाहिरात फलकधारकांनी (फ्लेक्स होर्डींग्ज) आपल्या जाहिरात फलकांची परवानगी महानगरपालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावरून ऑनलाइन पद्धतीने दि.३१ ऑक्टोबर २०२६ पर्यंत प्राप्त करून घ्यावी, असे आवाहन धुळे महानगरपालिकेच्या वतीने करण्यात आले आहे. परवानगी न घेतल्यास दंडात्मक कारवाई करण्याचा इशारा मनपा प्रशासनाने दिला आहे.

शहरातील जाहिरात फलकांचे नियमन करणे, जाहिरात फलकांना अधिकृत परवानगी असणे सुनिश्चित करणे आणि अनधिकृत जाहिरात फलकांवर नियंत्रण ठेवणे या उद्देशाने महानगरपालिकेमार्फत ही सूचना जारी करण्यात आली आहे.

विहित मुदतीत परवानगी प्राप्त न केलेले स्थिर जाहिरात फलक अनधिकृत समजण्यात येतील. अशा जाहिरात फलकधारकांकडून प्रतिचौरस फूट **(पान २ वर)**

मालवाहू टेम्पोची धडक दुचाकीस्वाराचा मृत्यू

नंदुरबार, दि.१६(प्रतिनिधी)- सारंगखेडा गावातील वाघेश्वरी मंदिरासमोरील रस्त्यावर मालवाहू टेम्पोने दुचाकीला मागून धडक दिल्याने नयनसिंग गुलाबसिंग राजपूत (वय २९, रा. मोठा मारुती नगर, प्लॉट क्रमांक ७५, शहादा) यांचा मृत्यू झाला. ही घटना १५ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी सुमारे ८:३० वाजता घडली.

मिळालेल्या माहितीनुसार, नयनसिंग राजपूत हे त्यांच्या ताब्यातील स्कूटी क्र. एमएच३९/एएम-८२९९ दोंडाईचा येथील अभिषेक कॉटन जिनिंगकडे जात होते. सारंगखेडा येथील वाघेश्वरी मंदिरासमोर मालवाहू टेम्पो क्र.एमएच **(पान २ वर)**

विलंबित जन्म-मृत्यू नोंदणी अर्जांबाबत ॲड.ज्ञानेश्वर बागुलांचे अध्यक्षांना पत्र

मुंबई, दि.१६- जन्म आणि मृत्यू नोंदणी सुधारणा कायदा २०२६ च्या अंतर्गत दोन वर्षांपेक्षा जास्त कालावधी उलटलेल्या जन्म आणि मृत्यूच्या नोंदींबाबत नागरिकांना होणारा त्रास टाळण्यासाठी तसेच संपूर्ण राज्यात एकसमान पद्धत लागू करण्यासाठी मुंबई उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायमूर्तींनी सर्व जिल्हा न्यायाधीशांना आवश्यक त्या सूचना द्याव्यात, अशी मागणी बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र अँड गोवाचे सदस्य ॲड. ज्ञानेश्वर सुरेश बागुल यांनी केली आहे. यासंदर्भात त्यांनी बार कौन्सिलचे अध्यक्ष यांना १६.१०.२०२६ रोजी पत्र पाठवून तात्काळ योग्य ते पाऊल उचलण्याची विनंती केली आहे.

केंद्र सरकारच्या राजपत्रामध्ये ०६.०८.२०२६ रोजी जन्म आणि मृत्यू नोंदणी सुधारणा कायदा २०२६ प्रसिद्ध करण्यात आला आहे. या सुधारित कायद्यातील तरतुदींनुसार दोन वर्षांचा कालावधी उलटल्यानंतरच्या जन्म व मृत्यूच्या नोंदींचे अर्ज स्वीकारणे आणि त्यावर आदेश देणे यासाठी प्रथम वर्ग **(पान २ वर)**

दिपक ज्वेलर्स
सोने- 22 K -1,35,700 रु.+3% GST
सोने- 24 K -1,47,500 रु.+3% GST
चांदी- 2,15,500 रु.+3% GST
तारगल्ली, सराफ बाजार, धुळे
फोन नं.२३३१०३/२३४१०३

वैजाली येथील गायरान जमिनीवरील पिकाचे दुष्काळी पंचनामे करा- मागणी



शहादा,दि.१६(प्रतिनिधी)- तालुक्यातील वैजाली येथील गायरान जमिनीवरील उभ्या पिकाचे दुष्काळी पंचनामे होऊन त्वरित शासनाने भरपाई द्यावी याबाबतचे लेखी निवेदन जमीन धारक शेतकरी शेतमजूर यांनी शहाद्याचे तहसीलदार संभाजीराव पाटील यांना दिले

निवेदनात म्हटले आहे की, आम्ही मौजे वैजाली येथील आदिवासी भिल्ल समाजाचे कायमचे रहिवासी असून दारिद्र्यरेषेखालील भूमिहीन शेतमजूर आहोत. आमच्या नावे गाव शिवार व इतरत्र कुठल्याही प्रकारचे सातबारा उतारे नाहीत. त्यामुळे आमच्याकडे उत्पन्नाचे कुठलेही साधन नसल्याने आम्ही वैजाली शिवारातील गुरचरण गायरान जमिनी सर्वे नंबर नुसार शासकीय पड जमिनी सुमारे चाळीस वर्षांपेक्षा जास्त काळापासून तयार करून कसून शेती करून कुटुंबाच्या उदरनिर्वाह करीत आहोत यावर्षी देखील आम्ही सदरच्या जमिनीत पीक पेरणी लागवड केलेली आहे तसेच मोठ्या प्रमाणात बी-बियाणे रासायनिक खते फवारणी औषधी यासाठी मोठ्या खर्च केलेला असून मात्र चालू वर्षी राज्यात व जिल्ह्यात दुष्काळी परिस्थिती असल्यामुळे त्याच्या फटका आमच्या शेतातील पिकांनाही बसलेला असून शेतातील उभे पिके पूर्णपणे नष्ट झालेली असल्याकारणाने इतर शेतकऱ्यांप्रमाणे **(पान २ वर)**

कृषि उत्पन्न बाजार समिती, शिरपूरकडून परवाना न घेतलेल्यांवर गुन्हे दाखल होणार- सभापती पाटील

शिरपूर, दि.१६- शिरपूर तालुक्यात दुष्काळी परिस्थिती असून शेतकरी बांधवांची पावसाअभावी झालेली अवस्था पाहता जे काही उत्पन्न मिळाले आहे किंवा मिळणार आहे त्यांची लूट होवू नये, तसेच शिरपूर तालुक्यात बऱ्याच घटना पाहता शेतकरी बांधवांची काही अनाधिकृत खरेदीदारांनी लूट केली आहे. शिरपूर कृऊबा कडून परवाना न घेतलेल्यांवर गुन्हे दाखल करण्यात येणार असल्याचा इशारा सभापती के. डी.पाटील यांनी दिला आहे.

कृषि उत्पन्न बाजार समिती, शिरपूरकडून शेतकरी बांधवांना आवाहन करण्यात येते की, कृषि उत्पन्न बाजार समितीच्या कार्यक्षेत्रात नियम धाब्यावर बसवून शेतमालाची परस्पर खरेदी-विक्री करणाऱ्या विना परवाना दलाल, एजंट, खरेदीदार, कृषि उत्पन्न बाजार समिती, शिरपूरकडून परवाना न घेता बेकायेदशिरपणे कोट्यावधीची उलाढाल करीत असून त्यामुळे शेतकऱ्यांची व कृषि उत्पन्न बाजार समितीचा महसूल बुडत असल्याचे उघड झाले आहे. तसेच अनाधिकृत व्यक्तींकडून मापाडी परवाना न घेता शेतमालाची मोजणी करण्यात येत आहे. या प्रकाराची गंभीर दखल घेत कृषि उत्पन्न बाजार समिती, शिरपूर आता थेट फौजदारी गुन्हे दाखल करण्याच आक्रमक पवित्रा घेतला आहे. कृषि उत्पन्न बाजार समिती, शिरपूरच्या कार्यक्षात्रात दररोज लाखो रुपयाच्या शेतीमालाची आवक होते. महाराष्ट्र कृषि उत्पन्न खरेदी-विक्री (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ चे कलम ६ (१) (ब) नुसार बाजार समिती कार्यक्षेत्रात शेतीमालाचा कोणत्याही व्यवहार करतांना बाजार समितीकडून अधिकृत परवाना घेणे **(पान २ वर)**

आपला महाराष्ट्र

नाशिकचा कुंभमेळा आणि प्रदूषित गोदावरी

गेल्या काही दिवसांपासून नाशिकच्या कुंभमेळ्याची चर्चा फार जोरात सुरू आहे. सगळ्यात आधी साधू ग्राम च्या निर्मिती विरोधात पर्यावरणवादी नाशिककरांनी फार मोठे आंदोलन केले. अर्थात धर्मवेड्यांनी पर्यावरणवादी जनतेच्या आंदोलनाला विरोध करून टीका केली. दरम्यान नाशिक मध्ये कुंभमेळ्याच्या तयारीसाठी अनेक कामे सुरू असून नाशिककर त्यामुळे त्रासले आहेत. सरकारच्या धोरण धार्मिक धार्जिणे असल्यामुळे पर्यावरणवादी असो की अजून कोणी असो सरकार त्यांचे काही ऐकायला तयार नाही. दरम्यान राज्यात दुष्काळ जाहीर झाल्यामुळे कुंभमेळ्यासाठी लागणारा हजारो कोटी रुपयांचा निधी दुष्काळासाठी वापरावा अशी मागणी राजकीय पक्षांनी केलेली आहे. काँग्रेसचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ त्यात आघाडीवर असून त्यांचाही आवाज सरकारपर्यंत पोहोचत नाही किंवा ऐकला जात नाही. खरेतर हा अट्टाहासच म्हणावा लागेल. सध्या गोदावरी नदी कोरडी आहे रामकुंडात आणि त्र्यंबकेश्वरच्या कुंडात पाणी नाही. कुंभमेळ्याचे ध्वजारोहण करावयाचे आहे त्यासाठी गंगापूर धरणातून पाणी सोडण्याची वेळ आलेली असल्याने तो सुद्धा टिकेचा विषय होत आहे. परंतु आयोजकांवर यापैकी कसलाच परिणाम होत नाही. हे दुर्दैवच म्हणावे लागेल. तशातच कुंभमेळ्याची तयारी सुरू असतानाच औद्योगिक प्रदूषणामुळे गोदावरी नदीच्या स्वच्छतेचा आणि नाशिककरांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झालेला आहे. तो गंभीर असून पर्यावरण विषयक अभ्यास करणाऱ्या साऊथ एशियन नेटवर्क ऑन डॅम्स रिव्हर्स अँड पीपल्स या संस्थेचा अहवाल प्रसिद्ध झालेला आहे त्यानुसार अंबड औद्योगिक क्षेत्राजवळील एका बोरवेलच्या पाण्यात कर्करोग होईल अशा घटकांचे प्रमाण मोठ्या संख्येवर आढळले आहे.

पिण्याच्या पाण्याच्या संदर्भात जे ठरलेले निकष आहेत त्यापेक्षा तब्बल १००६ पट अधिक असलेले हे घटक आहेत. कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर हे प्रकरण अतिशय गंभीर म्हणावे लागेल. वरील संस्थेने प्रसिद्ध केलेल्या अहवालाचा विचार करून सरकारने काही निर्णय घेतले आहेत किंवा कसे हे कळायला अजून तरी मार्ग नाही. या संस्थेच्या ८ ऑक्टोबर २०२६ रोजी प्रसिद्ध झालेल्या अहवालात अंबड औद्योगिक क्षेत्राच्या वस्तीतील एका बोरवेल मधील पाण्याचे नमुने घेऊन तपासले असता त्यात एका लिटर मागे साधारणपणे ५० मिलिग्रॅम घटक हे कॅन्सरला कारणीभूत ठरणारे दिसले. भारतीय मानक ब्युरोच्या निकषानुसार पिण्याच्या पाण्यातील वर उल्लेखलेले घटक फक्त .०५ मिली ग्रॅम पर्यंतच स्वीकारार्ह आहेत परंतु तपासलेल्या पाण्यात हे प्रमाण हजार पटीहून अधिक असून ही अतिशय चिंतेची बाब म्हटली पाहिजे. या पाण्याची तपासणी मान्यताप्राप्त प्रयोग शाळेत करण्यात आलेली आहे. औद्योगिक क्षेत्रातील कचऱ्यामुळे आणि घाण पाण्यामुळे दूषित पाणी नाल्यातून गोदावरीत वाहत जाते. यासाठी गोदावरीच्या पाण्याची वास्तविक पातळी आणि त्याचे प्रमाण किती आहे ते वेगवेगळ्या ठिकाणाहून पाण्याचे नमुने घेऊन तपासले पाहिजे. अन्यथा संपूर्ण नदी प्रदूषित होण्याचा धोका आहे. कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर हा धोका परवडणारा नाही. अंबड औद्योगिक क्षेत्रातील अनेक वस्त्यांमध्ये असलेले जे बोरवेल्स आहेत त्यातून पिवळे लाल पाणी येते आणि हेच पाणी घरगुती वापरासाठी वापरले जाते. स्थानिक कार्यकर्त्यांच्या तक्रारीनुसार अनेक बोरवेल्स मध्ये पिवळे पाणी असल्याचा ह्या अहवालात उल्लेख आहे.नाशिक महानगरपालिकेकडून पाणीपुरवठा अपुरा आणि अनियमित होत असल्याने बाधित कुटुंबांना अंघोळ, कपडे धुणे आणि भांडी स्वच्छ करणे यांसारख्या दैनंदिन कामांसाठी याच पाण्याचा वापर करावा लागत आहे.अहवालात लहान मुलांच्या शरीरावर फोड येणे, जखमा बऱ्या न होणे, त्वचा विकार तसेच काही नागरिकांना सूज येणे अशा तक्रारींचा उल्लेख करण्यात आला आहे. दोन महिलांनी गर्भपात झाल्याचेही सांगितले आहे. तथापि, या आरोग्यविषयक समस्यांचा दूषित पाण्याशी थेट संबंध आहे की नाही, हे निश्चित करण्यासाठी वैद्यकीय तपासणी आणि शास्त्रीय पडताळणी आवश्यक आहे.

संस्थेच्या म्हणण्यानुसार, या भागातील कष्टकरी कुटुंबांना उपचार, जखमांची काळजी आणि पर्यायी व्यवस्था यांवर आपल्या मासिक उत्पन्नातील मोठा हिस्सा खर्च करावा लागत आहे. त्यामुळे हा प्रश्न केवळ पर्यावरणीय प्रदूषणापुरता मर्यादित नसून सुरक्षित पाणीपुरवठा आणि सार्वजनिक आरोग्याशीही संबंधित आहे .प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या कारवाईवर देखील यामुळे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. संस्थेने आपल्या अहवालात असाही आरोप केला आहे की, ३० सप्टेंबर रोजी पिवळ्या पाण्यासंदर्भातील बातम्या प्रसारमाध्यमांत प्रसिद्ध झाल्यानंतर महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने केवळ एका कंपनीला कारणे दाखवा नोटीस बजावली होती.पाण्याच्या तपासणीचे निष्कर्ष सार्वजनिक करण्यात आले नव्हते आणि संभाव्य धोक्याबाबत बाधित रहिवाशांनाही पुरेशी माहिती देण्यात आली नव्हते. असेही या संस्थेने आपल्या अहवालात म्हटले आहे. प्रदूषणासाठी जबाबदार असलेल्या उद्योगांची ओळख पटवणे, प्रदूषण नियंत्रण मंडळाने आतापर्यंत केलेल्या कारवाईची संपूर्ण माहिती मिळवणे आणि भूजलातील प्रदूषणाचा प्रत्यक्ष विस्तार स्वतंत्रपणे तपासणे आवश्यक असले तरी तशी तपासणी हाती घेण्यात आली किंवा कसे याबाबत कुठलीही माहिती मिळत नाही. पाण्याच्या केवळ एका नमुन्याच्या आधारे संपूर्ण औद्योगिक क्षेत्रातील किंवा गोदावरी नदीतील पाण्याच्या गुणवत्तेबाबत निष्कर्ष काढता येणार नाही. म्हणून अंबड औद्योगिक क्षेत्रातील संबंधित उद्योगांची व्यापक तपासणी करण्याची, दूषित पाणी असलेल्या बोअरवेल बंद करण्याची, बाधित कुटुंबांना दररोज पर्यायी सुरक्षित पाणी उपलब्ध करून देण्याची आणि मोफत आरोग्य तपासणी शिबिरे आयोजित करण्याची गरज निर्माण झाली आहे तशी मागणी या संस्थेने त्यांच्या अहवालातून केली आहे.

नाशिक आणि त्र्यंबकेश्वर येथे २०२७ मध्ये सिंहस्थ कुंभमेळा आयोजित केला जाणार आहे. गोदावरी नदी हे या परिसरातील धार्मिक स्नानाचे प्रमुख केंद्र आहे. औद्योगिक सांडपाण्यातील विषारी रसायने नदीत मिसळत असतील, तर त्याचा परिणाम स्थानिक नागरिकांबरोबरच नदीवर अवलंबून असलेल्या इतर लोकांवरही होऊ शकतो, असा सदरच्या संस्थेचा इशारा आहे.संस्थेच्या अहवालात कुंभमेळ्याच्या ध्वजारोहणाचा कार्यक्रम ३१ ऑक्टोबर २०२६ रोजी होणार असल्याचे नमूद केले आहे. त्यामुळे नदीच्या पाण्याची गुणवत्ता तपासणे आणि औद्योगिक प्रदूषणावर नियंत्रण ठेवणे हा कुंभमेळ्याच्या तयारीतील महत्त्वाचा भाग असला पाहिजे.मात्र नाशिककरांनी अद्यापि या प्रश्नावर भाष्य केलेले नाही.प्रशासनासमोर सध्या तीन तातडीची आव्हाने आहेत. बाधित वस्तीतील नागरिकांना सुरक्षित पाणी उपलब्ध करून देणे, प्रदूषणाचा स्रोत शोधून जबाबदार उद्योगांवर कारवाई करणे आणि गोदावरी नदीच्या पाण्याची गुणवत्ता स्वतंत्रपणे तपासणे अशी आव्हाने आहेत.कुंभमेळ्याच्या तयारीत घाट, रस्ते आणि इतर सुविधांचा विकास महत्त्वाचा असला, तरी नदीचे पर्यावरण आणि स्थानिक नागरिकांची सुरक्षितता यांनाही तितकेच महत्त्व दिले पाहिजे. भाविकांच्या धार्मिक सकानापूर्वी संबंधित घाटांवरील पाण्याची गुणवत्ता काय आहे आणि प्रदूषण रोखण्यासाठी कोणती पावले उचलण्यात आली आहेत, हे स्पष्ट होणे आवश्यक आहे.

सिंहस्थ कुंभमेळ्याच्या भव्य आयोजनाबरोबरच गोदावरी नदीची प्रदूषणमुक्ती आणि नागरिकांना सुरक्षित पाणी उपलब्ध करून देणे, ही प्रशासनाची महत्त्वाची जबाबदारी आहे. त्या दृष्टीने महापालिका, कुंभमेळा मंत्री, प्रशासन, सरकार आणि पर्यावरण प्रेमी नाशिककर यांनी याकडे गांभीर्याने लक्ष देणे आवश्यक झाले आहे.

नाशिकला कुंभमेळा आहे म्हणून त्यानिमित्ताने हे प्रश्न निर्माण झालेले असले तरी उत्तर महाराष्ट्रातील बहुतेक नद्यांचा प्रवाह प्रदूषित बनलेला आहे. पांझरा नदीचे धार्मिक महत्त्व गोदावरी इतके निश्चितच नाही. तिच्या काठावर कुंभमेळा भरण्याची शक्यता नाही. तरीपण या नदीच्या प्रदूषणाचे गांभीर्य नाकारता येणार नाही. प्रचंड घाण पाणी पांझरा नदीत गावांमधून आणि धुळे शहरातून सोडले जाते. उत्तर महाराष्ट्रात सगळ्यात घाण पाण्याचे नाले धुळे शहरातून वाहतात आणि ते पांझरा नदीला मिळतात. शिवाय अख्या शहराचे सांडपाणी पांझरा नदीतच सोडले जाते. त्यामुळे या नदीच्या पात्रातील पाण्यात नेमके कुठले घटक आहेत ते तपासले जात नसल्याने कळत नाहीत. पण तपासल्यास निश्चितच गंभीर काहीतरी आढळेल. तेव्हा राज्यकर्ते, धुळेकर जनता, स्थानिक कारभारी जागे होतील का असा प्रश्न आहे. नाशिककर प्रदूषित पाण्याच्या संदर्भात जात्यात असले तरी धुळेकर काही सुपात नाहीत तेही जात्यातच आहेत मात्र त्यावर चर्चा होत नसल्याने सर्व काही आलबेल असल्याचे दाखविले जाते.

शेतकऱ्याच्या बाजूने निर्णय
निकृष्ट बियाण्यांमुळे नुकसान
६ ला.७५ ह.ची भरपाई मंजूर

धुळे, दि.१६ (प्रतिनिधी)-निकृष्ट बियाण्यांमुळे कारले पिकाचे नुकसानझाल्याच्या प्रकरणात जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, धुळे यांनी शेतकऱ्यांच्या बाजूने महत्त्वपूर्ण निर्णय दिला आहे. शिंदखेडा तालुक्यातील शेतकरी विश्वासराव पंडितराव पाटील व गिरीश विश्वासराव पाटील यांनी सुमारे दोन एकर क्षेत्रावर कारले पिकाची लागवड केली होती. मात्र, बियाण्यांची उगवण क्षमता केवळ टक्के राहिल्याचे कृषी विभागाच्या पाहणी अहवालात नमूद करण्यात आले होते, ज्यामुळे शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले.



या प्रकरणी दाखल ग्राहक तक्रार क्रमांक २२२/२०२३ मध्ये निर्णय देताना आयोगाने बियाणे उत्पादक कंपनीला ६लाख ७५ हजार रुपये नुकसानभरपाई वार्षिक ६ टक्के व्याजासह देण्याचे आदेश दिले आहेत. याशिवाय १० हजार रुपये मानसिक त्रासापोटी आणि ७ हजार रुपये तक्रार खर्चापोटी मंजूर करण्यात आले असून, ही सर्व रक्कम ४५ दिवसांच्या आत अदा करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. या प्रकरणात ॲड. श्रेष्ठ एस. अग्रवाल यांनी कृषी विभागाचा पंचनामा, बियाणे खरेदीची बिले व इतर कागदपत्रे सादर करून शेतकऱ्यांची बाजू प्रभावीपणे मांडली. त्यांना ॲड. नितीन आयाचित आणि ॲड. पूजा ई. भावसार यांनी सहकार्य केले. या निर्णयामुळे बियाण्यांच्या गुणवत्तेबाबत शेतकऱ्यांच्या हक्कांचे संरक्षण तसेच ग्राहक संरक्षण कायद्यांतर्गत भरपाई मिळण्याचे महत्त्व अधोरेखित झाले आहे.

जाहीर नोटीस

तमाम जनतेस, बँकांना, हित संबंधितांना सदर जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मिळकतीचे वर्णन, मौजे देवपुर ता.धुळे जि.धुळे येथील स.नं.९० चैकी प्लॉट नं. २८ चे एकूण क्षेत्र ४७३.८० चौ.मी. सुमारे ५१०० चौ फुट. यास लागु विस्तारीत सि.स.नं. ३४४३ चे एकूण क्षेत्र ४२०.०० चौ.मी. यापैकी पुर्वेकडील भाग अविभक्त क्षेत्र ३३४.४५ चौ.मी. वरबळ प्लॉट.

यासी मापे व चतु:सिमा संपुर्ण प्लॉटच्या.

दिशा	मापे	चतु:सिमा
पूर्वेस	- ६० फुट	९ मीटर रुंदीचा रस्ता
पश्चिमेस	- ६० फुट	प्लॉट नं. २७
दक्षिणेस	- ६० फुट	९ मीटर रुंदीचा रस्ता
उत्तरेस	- ६० फुट	प्लॉट नं. ६६

येणे प्रमाणे हि मिळकत श्री.योगेश धनराज पाटील व श्री. जितेंद्र प्रकाश मराठे दोन्ही रा. धुळे. यांचे तावे उपभोगातील मालकीची होती व आहे सदर मिळकत हि आमचे पक्षकाराने तोंडी सौदा केला आहे. ह्या मिळकतीच्या खरेदीचा व्यवहार संबधीत पक्षकार पूर्ण करणार आहे


तरी सर्वांना या जाहीर नोटीसणे कळविण्यात येते की, सदर मिळकत संबधी कोणाचाही कुठल्याही प्रकारे सौदा पावती, हक्क, हित संबध देणे घेणे, मालकीहक्क, भाडेपट्टा व लीज, ताबा, गहान, दान, बोजा, कर्ज, लीज, टाच वा वारस हक्क, खावटी ज.मु.वैगेरे कोणत्याही व कुठल्याही प्रकारे हक्क व अधिकार असल्यास सदर नोटीस जाहीर झाल्याचे ०७ दिवसाचे आत योग्य त्या कागदपत्राच्या प्रती सहित आमचे ऑफिसात हरकती सादर कराव्यात. परस्पर जाहीर नोटीस वर्तमानपत्रात आल्यास त्या ग्राह्य धरण्यात येणार नाही व हरकती न आल्यास आमचे पक्षकार सदर मिळकत हि निर्बोज म्हणून खरेदी करतील नंतर आलेल्या हरकती ह्या ग्राह्य धरल्या जाणार नाही. सदर जाहीर नोटीस आमचे पक्षकाराने दिलेल्या माहितीवरून आमचे मार्फत प्रसिद्ध करण्यात आली आहे.

येणे प्रमाणे जाहीर नोटीस होय.

ठिकाण-धुळे दि. :- १६/१०/२०२६

ॲड. आशा शिवकुमार डोंगरे
(नोटरी भारत सरकार)
एफ ५६, पहिला मजला, गरुड कॉम्प्लेक्स, साक्री रोड, ता.जि.धुळे
मो. ९९२३३६६१११

प्रकाश में आज- शतरंज



राजेंद्र कुमार वहीदा रहेमान महेमूद हेलन शाम कुमार मदनपुरी शशीकला आगा कमलकपूर

देवरे तंत्रनिकेतन मध्ये योगा मेडिटेशन कार्यशाळा संपन्न

धुळे, दि.१६- श्री शिवाजी विद्या प्रसारक संस्थेच्या बापूसाहेब शिवाजीराव देवरे तंत्रनिकेतन मध्ये योगा आणि मेडिटेशन या विषयावर एक दिवसीय कार्यशाळेचे नुकतेच आयोजन करण्यात आले होते.

याप्रसंगी प्रमुख मार्गदर्शक म्हणून सुपरिचित योग शिक्षक डॉ जितेंद्र भामरे उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की नियमित योगाभ्यास प्राणायाम केल्याने शरीर व मन संतुलित रहाते. आनंदी व निरोगी जीवनसाठी योगासनांची मोठी मदत होते. या कार्यशाळेत योगशिक्षिका मनिषा पाटील यांनी सूर्यनमस्कार, प्राणायाम आणि ध्यान याचे प्रात्यक्षिक विद्यार्थ्यां समोर सादर केले. महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाने प्रथम वर्ष तंत्रशिक्षण विद्यार्थ्यांसाठी योगा व मेडिटेशन हा विषय अभ्यासक्रमात समाविष्ट केला असून, त्यानुसार या कार्यशाळेचे आयोजन अप्लाइड सायन्स विभागातर्फे करण्यात आले होते.कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी तंत्रनिकेतन प्राचार्य प्रा.संजय हिरे होते त्यांनी डॉ. जितेंद्र भामरे यांचे स्वागत केले. मेकॅनिकल इंजिनिअरिंग विभाग प्रमुख प्रा.महेंद्र पाटील, अप्लाईड सायन्स विभाग प्रमुख प्रा.डी.एस. पाटील, ए आय विभाग प्रमुख प्रा रत्ना पाटील, प्रा. के.जी. सूर्यवंशी व्यासपीठावर उपस्थित होते. प्रास्ताविक सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन प्रा.भावना पाटील यांनी केले. अप्लाईड सायन्स सायन्स विभागाचे सर्व प्राध्यापक तसेच प्रथम वर्ष तंत्रनिकेतन चे विद्यार्थी व विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. विद्यार्थ्यांच्या उत्साहात या कार्यशाळेचा समारोप झाला.

पान १ वरुन

विलंबित जन्म-मृत्यू नोंदणी अर्जांबाबत

न्यायदंडाधिकारी व कनिष्ठ न्यायालयांना स्पष्ट निर्देश मिळणे आवश्यक आहे. यासाठी मुंबई उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायमूर्तींनी राज्यातील सर्व जिल्हा न्यायाधीशांना आपापल्या कनिष्ठ न्यायालयांसाठी परिपत्रक काढण्याचे निर्देश द्यावेत, जेणेकरून राज्यभरात या कायद्याची एकसमान अंमलबजावणी होईल आणि सर्वसामान्य नागरिकांची होणारी अडवणूक टळेल, याकडे ॲड. बागुल यांनी पत्राद्वारे लक्ष वेधले आहे.

अनधिकृत फलकांवर दंडात्मक

प्रतिदिन २० रुपये या दराने शुल्क आकारण्यात येईल. तसेच, महाराष्ट्र मालमत्तेच्या विरूपणास प्रतिबंध करण्याकरिता अधिनियम, १९९५ च्या कलम ३ अन्वये संबंधितांविरुद्ध गुन्हा दाखल करण्याची कारवाई करण्यात येईल. त्यामुळे धुळे महानगरपालिका हद्दीतील सर्व स्थिर जाहिरात फलकधारकांनी कोणतीही दंडात्मक कारवाई टाळण्यासाठी दि. ३१ ऑक्टोबर २०२६ पूर्वी ऑनलाइन पद्धतीने परवानगी प्राप्त करून घ्यावी, असे आवाहन महानगरपालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

बुलेटस्वारांना चाप, सायलेन्सवर फिरला रोलर

काढले जात होते. त्यामुळे ध्वनीप्रदूषणातही वाढ झाली होती. त्याबाबत नागरिकांमधून मोठ्या प्रमाणात तक्रारी येत होत्या. त्याची दखल घेऊन शहर पोलिस ठाण्यात निरीक्षक किशोरकुमार परदेशी, डीबी पथकाचे जवान आणि सहकाऱ्यांनी करवंद नाका परिसरात धडक कारवाई केली. फटाका बुलेट हेरुन संबंधित छपरी युवकांची मानगूट पकडण्यात आली. त्यानंतर सायलेन्सर वेगळे करुन एकत्र करण्यात आले. त्यावर रोड रोलर फिरवून निकामी करण्यात आले. या कारवाईमुळे शहरात समाधान व्यक्त होत असून ही कारवाई नियमित सुरु ठेवावी अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

मालवाहू टेम्पोची धडक दुचाकीस्वाराचा मृत्यू

०५/बीके-१९८७ वरील चालकाने भरधाव वेगाने वाहन चालवून रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष केले. त्यानंतर अचानक ब्रेक लावल्याने टेम्पोची स्कूटीला मागून धडक बसली. या अपघातात नयनसिंग यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाल्याने त्यांचा मृत्यू झाला. अपघातात स्कूटीचेही नुकसान झाले.

वैजाली येथील गायरान जमिनीवरील

आमच्या शेतातील पिकांचे ही त्वरित पंचनामे करून आम्हाला इतर शेतकऱ्यांप्रमाणे नुकसान भरपाई व दुष्काळग्रस्त शासकीय मदत मिळावी अशी विनंती निवेदनातून करण्यात आली निवेदनाची प्रत राज्याचे महसूल मंत्री ना.चंद्रशेखर बावनकुळे, जिल्हाधिकारी डॉ. मिताली शेट्टी यांना देण्यात आले असून यावेळी भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते डॉ.कांतीलाल टाटीया यांच्या नेतृत्वाखाली लेखी निवेदन सादर करण्यात आले.

यावेळी भाजपाचे तालुका उपाध्यक्ष संजय पाटील, माजी पंचायत समिती सदस्य उत्तम शेंमळे, नुकसानग्रस्त शेतकरी गोरख पवार, सुरेश शेंमळे,भगवान ठाकरे, गोविंदा शिंदे, रमेश ठाकरे, कृष्णा वळवी, दिलीप ठाकरे, जबनाबाई ठाकरे, सुनिता धारपवार ,करण पाडवी, वसंत महिरे, विनोद पाडवी, दिलबर शेंमळे यांच्यासह इतर शेतकरी शेतमजूर उपस्थित होते. याबाबत लवकर कारवाई करण्याचे आश्वासन तहसीलदार संभाजीराव पाटील यांनी दिले.

कृषि उत्पन्न बाजार समिती, शिरपूरकडून परवाना न

कायदेशिररित्या बंधनकारक आहे. परंतु प्रत्यक्षात परवाना नसलेले दलाल व्यापारी थेट शेतकऱ्यांशी संपर्क साधून शेतमाल खरेदी करतात व त्यामुळे फसवणूकीचे प्रकार देखिल घडून येतात. तरी याव्दारे आवाहन करण्यात येते की, शेतकरी बांधवांनी कृषि उत्पन्न बाजार समितीकडून परवाना घेतलेल्या परवानाधारक व्यापाऱ्यांकडून नियमानुसार त्या व्यवहाराची कृषि उत्पन्न बाजार समिती, शिरपूरची तकपट्टी, हिशोबपट्टी घेवून व वजनमापे तपासून व्यवहार करावा. जेणे करुन याबाबत शेतकऱ्यांची फसवणूक होणार नाही.

सदर प्रकाराबाबत कृषि उत्पन्न बाजार समिती, शिरपूर येथे शेतकरी बांधवांच्या होत असलेल्या भावात व मापात फसवणूकी बाबतच्या अनेक तक्रारी बाबत अनौपचारीक बैठक पार पाडली त्यामध्ये विना परवाना व्यवहार करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाईचा इशारा देण्यात आला. बाजार समितीच्या नियमांचे उल्लंघन करुन परस्पर व्यवहार करणाऱ्या अशा सर्व घटकांवर आता कृषि उत्पन्न बाजार समिती, शिरपूरच्या वतीने थेट पोलीस ठाण्यात फौजदारी गुन्हे दाखल केले जातील असा इशारा देखिल कृषि उत्पन्न बाजार समिती प्रशासनाच्या वतीने दिलेला आहे. याबाबत पोलीस प्रशासनाला कळविण्यात आलेले आहे.

पान १ वरुन

शेतकरी अल्प मदतीच्या निषेधार्थ शिवसेनेचे आंदोलन

नागरिकांना सामोरे जावे लागत आहे. या परिस्थितीत शेतकऱ्यांना पुरेशी आर्थिक मदत मिळणे आवश्यक असताना सरकारने जाहीर केलेली मदत त्यांच्या अडचणी दूर करण्यासाठी अपुरी असल्याची भूमिका शिवसेनेने मांडली.

मुख्यमंत्र्यांनी आपल्या कुटुंबासह पाच हजार एक रुपयांत दिवाळी साजरी करून दाखवावी, असे आव्हान देत शिवसेनेने सरकारच्या मदतीच्या निर्णयावर टीका केली. दुष्काळाच्या झळा केवळ शेतकऱ्यांनाच नव्हे, तर शेतमजूर, मोलमजुरी करणारे कामगार आणि सर्वसामान्य नागरिकांनाही बसत आहेत. त्यामुळे शासनाने शेतकरी आणि कष्टकरी जनतेच्या परिस्थितीचा गांभीर्याने विचार करून दिलासा द्यावा, अशी मागणी करण्यात आली.

याशिवाय, वाढत्या महागाईमुळे खाद्यतेल, साखर आणि जीवनावश्यक वस्तूंच्या किमतींनी सर्वसामान्यांचे आर्थिक गणित बिघडले आहे. त्यात डिजिटल वीजमीटरमुळे वीजबिल भरण्यास उशीर झाल्यास वीजपुरवठा खंडित होण्याच्या समस्येबाबतही शिवसेनेने चिंता व्यक्त केली. कष्टकरी नागरिकांना परवडेल अशी वीजबिल व्यवस्था करावी आणि सर्वसामान्यांना आर्थिक दिलासा द्यावा, अशी मागणी करण्यात आली.

हेक्टरी एक लाख रुपयांची मदत द्या!

दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना तुटपुंज्या मदतीऐवजी प्रति हेक्टर एक लाख रुपयांची आर्थिक मदत जाहीर करावी, अशी प्रमुख मागणी शिवसेनेच्या वतीने करण्यात आली. शेतकऱ्यांच्या नुकसानीचा गांभीर्याने विचार करून शासनाने तातडीने निर्णय घ्यावा, अन्यथा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने तीव्र स्वरूपाचे आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला.

यावेळी जिल्हाप्रमुख पंडित माळी,उपजिल्हा प्रमुख डॉ.हेमंत शर्मा ,युवा सेना जिल्हाधिकारी सागर पाटील,महिला जिल्हाआघाडी प्रमुख रीना पाडवी, जिल्हासचिव दिनेश सोनवणे,कार्याध्यक्ष मन्नान गणी शिकलीकर,तालुकाप्रमुख रमेश पाटील, युवासेना उपजिल्हाधिकारी दिनेश भोपे,अल्पसंख्याक जिल्हाध्यक्ष इम्तियाज कुरेशी, युवा सेना सचिव, अक्षय श्रीखंडे, खंडू माळी, भक्तवत्सल सोनार, संगीता माळी,दिपाली वाघ, जयश्री सोनवणे,भरत गुरव, निंबा पाटील,गोपाल राजपूत ,जनक त्रिवेदी,संतोष पाटील,रीजवान शेख, आदी उपस्थित होते.

शासनाने मागण्यांकडे दुर्लक्ष केल्यास नंदुरबार जिल्ह्यात मंत्र्यांना फिरू दिले जाणार नाही, असा इशारा देत शिवसेनेने सरकारविरोधातील आपली भूमिका स्पष्ट केली. दुष्काळग्रस्त शेतकरी आणि कष्टकरी जनतेला प्रत्यक्ष दिलासा मिळणार की केवळ घोषणांवरच समाधान मानावे लागणार, असा प्रश्न या आंदोलनाच्या माध्यमातून उपस्थित करण्यात आला.

डुकरांकडून मका उध्दवस्त पोलिसात तक्रार दाखल

संबंधित डुक्कर मालकांशी संपर्क साधला असता त्यांनी उडवाउडवीची उत्तरे दिल्याचे तक्रारदाराने म्हटले आहे. त्यामुळे दोषींवर कायदेशीर कारवाई करून नुकसानीची भरपाई मिळवून द्यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

परिचर्या संवर्गातील पदे सरळ सेवेने भरण्यासाठी

भरती होत नसल्यामुळे सध्या कार्यरत असलेल्या परिचारिकांवर अतिरिक्त कामाचा ताण पडत आहे. परिणामी, आरोग्य कर्मचाऱ्यांना मानसिक आणि शारीरिक तणावाचा सामना करावा लागत आहे. त्याचा परिणाम रुग्णसेवेवर होत आहे. कंत्राटी पद्धतीने नियुक्त करण्यात येणाऱ्या कर्मचाऱ्यांना समान कामासाठी समान वेतन मिळत नसल्याचा आरोपही संघटनेने केला आहे. याशिवाय, कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या नोकरीची कोणतीही शाश्वती नसल्याने त्यांच्यात असुरक्षिततेची भावना निर्माण होत आहे. ही कंत्राटी भरती संविधानातील कलम १४, १६, २१, ३८ आणि ३९ यांच्या विरोधात असल्याचा दावाही संघटनेने निवेदनातून केला आहे. विविध मागण्यांसंदर्भात प्रशासनाला सात दिवसांची मुदत देऊन पूर्वसूचना दिली होती. मात्र, मागण्यांची पूर्तता झाली नसल्याने अधिष्ठाता कार्यालयासमोर बेमुदत धरणे आंदोलन करण्यात येत आहे. परिचारिकांची कंत्राटी पद्धतीने होणारी पदभरती रद्द करून नियमित सरळसेवेने भरती करण्यात यावी. पदभरती प्रक्रियेतील ८०:२० ची अन्यायकारक अट रद्द करण्यात यावी. रजिस्ट्रेशनच्या नूतनीकरणासाठी सीएनईची सक्ती रद्द करून कर्मचाऱ्यांची आर्थिक लूट थांबवावी.केंद्र सरकारच्या धर्तीवर परिचर्या संवर्गातील कर्मचाऱ्यांना दहा रुपये नर्सिंग भत्ता लागू करण्यात यावा. पदोन्नतीसाठी पात्र असलेल्या कर्मचाऱ्यांना विलंब न करता तातडीने पदोन्नती देण्यात यावी.

पोहताना दुखापत तरुणाचा मृत्यू

दाखल केले, पुढील उपचारासाठी धुळे येथील खासगी हॉस्पीटलमध्ये दाखल केले होते, एक्सरे काढला असता त्याचे मानेचे हाड मोडलेले व नसांनाही मार लागल्याचे सांगितले. पुढील उपचारासाठी सर जे.जे. रुग्णालय मुंबई येथे नेले. ३० सप्टेंबरला मुंबई येथे नेले. त्याच्या मानेच्या मोडलेले हाडाची शस्त्रक्रीया झाली. त्याच्यावर उपचार सुरू असतांना १० ऑक्टोबरला सकाळी त्याचा मृत्यू झाला. याप्रकरणी पिंपळनेर पोलीस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद झाली. हवालदार प्रकाश मालचे तपास करीत आहेत.

धुळे महानगरपालिका
मालमत्ता विभाग

विषय : स्थिर जाहीरात फलकांची (fixed hoarding)
परवानगी प्राप्त करुन घेण्याबाबत

जाहीर सूचना

धुळे महानगरपालिका क्षेत्रात स्थिर जाहिरात फलक (fixed hoarding) प्रदिर्शित केलेल्या सर्व जाहिरात फलक धारकांना सूचित करण्यात येते की, धुळे महानगरपालिका हद्दीत आपण प्रदर्शित केलेल्या सर्व स्थिर जाहिरात फलकांच्या परवानग्या महानगरपालिकेच्या संकेतस्थळावरून ऑनलाईन पद्धतीने दि. ३१/१०/२०२६ पर्यंत प्राप्त करून घ्याव्यात.

आपण या मुदतीत परवानगी प्राप्त न करून घेतल्यास आपण प्रदर्शित केलेला जाहिरात फलक अनधिकृत समजून आपल्याकडून २० रू/प्रति चौ.फुट/प्रतिदिन या दराप्रमाणे शुल्क आकारण्यात येईल. तसेच महाराष्ट्र मालमत्तेच्या विरूपणास प्रतिबंध करण्याकरिता अधिनियम , १९९५ च्या कलम ३ अन्वये गुन्हा दाखल करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

ठिकाण : धुळे दिनांक - १७/१०/२०२६


नितीन कापडणीस, आयुक्त
धुळे महानगरपालिका



ता. १७ से रोज २ खेल टा. ६,९ बजे

जेलर-2 (हिंदी)

9422789999/9823177599 Jyoticinemadhule. bookmyshow



ता. १७ से रोज १ खेल टा. १२ बजे

नई-नवेली (हिंदी)

9422789999/9823177599 Jyoticinemadhule. bookmyshow



ता. १७ से रोज १ खेल टा. ३ बजे

दृश्यम (हिंदी)

9422789999/9823177599 Jyoticinemadhule. bookmyshow

जाहीर नोटीस

नि. ०७

शिरपूर येथील मे. सिव्हील जज्ज सो. ज्युनिअर डिव्हीजन यांचे कोर्टात

दि. कि. अर्ज नं. १०१०/२०२६

१) म

चाकळे शिवारातुन केबल लांबवली

नंदुरबार, दि.१६- चाकळे शिवारातील टॉवर क्रमांक सी-२३ येथील मशीनमधून अज्ञात चोरट्याने तांब्याची पॉवर केबल वायर आणि इलेक्ट्रिक बसबार असा एकूण ९४,५०० रुपये किमतीचा मुद्देमाल चोरून नेल्याची घटना घडली. २५ सप्टेंबर २०२६ रोजी रात्री १ ते ३ वाजेदरम्यान ही चोरी झाली. परिसरात चोरीच्या घटनांमध्ये वाढ झाल्याने गस्त वाढविण्याची मागणी होत आहे. तांब्याची तार चोरणाऱ्यांमध्ये संबंधित ठिकाणच्याच काहींचे लागे बांधे असल्याचे बोलले जात आहे. अशा घटनांवर आळा बसावा. याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस हवालदार रविंद्र पवार करीत आहेत.

महिला लोकशाही दिनाचे आयोजन

धुळे, दि.१६- जिल्ह्यातील समस्याग्रस्त व पिडीत महिलांना त्यांचे प्रश्न मांडण्यासाठी व्यासपीठ मिळावे, तसेच त्यांच्या हक्काचे संरक्षण होवून त्यांना न्याय मिळावा. यासाठी प्रत्येक महिन्यात जिल्हास्तरावर महिला लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येते. माहे ऑक्टोबर, २०२६ महिन्याचा महिला लोकशाही दिन सोमवार, १९ ऑक्टोबर, २०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, धुळे येथे आयोजित करण्यात आला आहे.

महिला लोकशाही दिनाचे अर्जाचा नमुना जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय, प्लॉट नं. ५२, जयहिंद कॉलनी, देवपुर, धुळे येथे मिळतील. अर्ज विहित नमुन्यात असावा, तक्रार/निवेदन हे अर्जदाराचे वैयक्तिक असावे. तसेच न्यायप्रविष्ट प्रकरणे, विहित नमुन्यात नसणारे व आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रती न जोडलेले अर्ज, सेवा विषयक, आस्थापना विषय अर्ज/तक्रार/निवेदन तसेच पोस्टाने पाठविलेले अर्ज स्वीकारले जाणार नाहीत. असे सदस्य सचिव, महिला लोकशाही दिन तथा जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, धुळे यांनी कळविले आहे.

हस्ती ग्रुप ऑफ स्कूल्सतर्फे क्रिकेट स्पर्धांचे आयोजन

